**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या ५ वर्षात दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या प्रत्येक शहरात किमान एक नागरी सहकारी बँक उभारण्याचं उद्दिष्ट ठेवावं, असं केंद्रीय सहकारमंत्र्यांचं आवाहन

- चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशात बेरोजगारीच्या दरात २ दशांश अंकांची घट

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज

**आणि**

- दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाबाहेर एका कारमध्ये स्फोट, आठ जण ठार तर १५ जखमी

**<><><><><>**

देशातल्या दोन लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात येत्या पाच वर्षांत किमान एक नागरी सहकारी बँक असली पाहिजे, असं उद्दिष्ट ठेवावं, असं आवाहन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं आज सहकारिता महाकुंभ २०२५ या, शहरी सहकारी कर्जासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेत धोरण, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यावर सखोल मंथन व्हावं आणि परिषदेच्या शेवटी प्रसिद्ध होणाऱ्या जाहीरनाम्यात सहकार क्षेत्रासमोरच्या अडचणी सोडवण्याचे उपाय आणि कालबद्ध कार्यक्रम असावा, जेणेकरून शहरी सहकारी बँकांच्या विस्ताराचं स्वप्न लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात शहा यांनी सहकार डिजी पे आणि सहकार डिजी लोन या दोन डिजिटल

मंचांचा प्रारंभही केला. या दोन मंचांचा मोठा फायदा सहकारी बँकांना होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अमूल आणि इफको या भारताच्या सहकार क्षेत्रातल्या कंपन्यांनी, जगातल्या आघाडीच्या सहकारी संस्था म्हणून स्थान मिळवल्याबद्दल शहा यांनी त्यांचं अभिनंदन केलं. देशातल्या सहकारी संस्था मजबूत करण्यासोबतच वंचितांना वर आणण्याचं ध्येय सहकार मंत्रालयानं ठेवलं असल्याचं त्यांनी सांगितलं. सहकार संस्थांनी कामाचा दर्जा सुधारणं, आर्थिक शिस्त कायम ठेवणं आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानात पारंगत असलेल्यांना या प्रणालीत आणणं गरजेचं असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशात बेरोजगारीचं प्रमाण कमी झालं आहे. बेरोजगारीचा दर २ दशांश अंकांनी घसरून ५ पूर्णांक दोन दशांशांवर आला आहे. एप्रिल ते जून या तिमाहीत हा दर ५ पूर्णांक ४ दशांश टक्के होता. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने प्रसिद्ध केलेली आकडेवारी सांगते, की जुलै ते सप्टेंबर या काळात ग्रामीण भागात बेरोजगारीचा दर ४ पूर्णांक ४ दशांश टक्के होता, तर शहरी भागात ६ पूर्णांक ९ दशांश टक्के लोक बेरोजगार होते. कमावत्या महिलांचं प्रमाण ३३ पूर्णांक ७ दशांश टक्के झालं जे पहिल्या तिमाहीत ३३ पूर्णांक ४ दशांश होतं.

**<><><><><>**

सन २०२४-२५ या वर्षात भारतानं १ लाख ५१ हजार कोटी रुपयांचं संरक्षण उत्पादन केलं असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. यात संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा वाटा ७१ पूर्णां ६ दशांश असल्याचं ते म्हणाले. ते नवी दिल्ली इथं डीपीएयू इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. भारताची संरक्षण

उत्पादन निर्यात ६ हजार ६९५ कोटीवर पोहोचली आहे, यावरून भारताच्या उत्पादनांवरचा जगाचा विश्वास अधोरेखित होतो असं राजनाथ सिंह म्हणाले.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीचं मतदान उद्या होणार असून निवडणूक आयोगाकडून मतदानासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून….

**व्हीसी**

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी १२२ मतदारसंघात ४५ हजार मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. उद्या सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान होईल. काही मतदारसंघांमधे सुरक्षेच्या कारणास्तव मतदानाची वेळ संध्याकाळी पाच वाजेपर्यंत असेल. या टप्प्यात १ हजार ३०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून तीन कोटी ७० लाख मतदार या उमेदवारांमधून आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नेपाळला लागून असलेल्या सीमा तसंच उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडला लागून असलेल्या सीमा बंद करण्यात आल्याचं पोलीस महासंचालक विनय कुमार यांनी सांगितलं. तसंच भारत-नेपाळ सीमेवरील मैत्री एक्स्प्रेस रेल्वे सेवा निवडणुकीपुरती बंद केल्याचंही त्यांनी सांगितलं.*

*या टप्प्यात भाजपा ५३, संयुक्त जनता दल ४४ आणि लोकजनशक्ती पार्टी रामविलास १५ जागांवर निवडणूक लढत आहे. तर महाआघाडीमधे राजद ७१, काँग्रेस ३७, व्हीआयपी ८, भाकप माले ६, भाकप ४ आणि माकप एका जागेवर निवडणूक लढत आहे. सहा मतदारसंघांमधे महाआघाडीतल्या उमेदवारांची मैत्रीपूर्ण लढत होत आहे.)*

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली. १७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येतील. निवडणुकीसाठीचं मतदान दोन डिसेंबरला, तर मतमोजणी तीन डिसेंबरला होणार आहे.

**<><><><><>**

मुंबई महापालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याची घोषणा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज केली. ते नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

<><><><><>

नवी दिल्लीत लाल किल्ला परिसरात आज संध्याकाळी सातच्या सुमाराला एका कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटात ८ जण ठार तर १५ जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. जखमींपैकी तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना लोकनायक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या स्फोटामुळे आजूबाजूच्या गाड्यांचंही नुकसान झालं आहे. ही गाडी लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या गेट क्रमांक १ जवळ उभी होती. स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या, श्वान पथक, न्यायवैद्यकीय पथक आणि दिल्ली पोलिस दाखल झाले आहेत. स्फोटाचं कारण अद्याप समजलेलं नाही. स्फोटाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

<><><><><>

मणिपूरमधल्या नोने जिल्हा प्रशासनाने नोने जिल्हा आणि आसपासच्या परिसरात अमूर फाल्कन या पक्ष्यासह स्थलांतरित पक्ष्यांची शिकार करणं, पकडणं आणि विक्री करण्यावर बंदी घातली आहे. तसंच या आदेशानुसार या स्थलांतरित पक्ष्याचे सेवन करणे, ताब्यात ठेवणं वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या कलम ५० आणि  ५१ अंतर्गत दंडनीय गुन्हा असल्याचं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

भारत आणि चीनमधील हवाई वाहतूक सेवा पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा सुरू झाली. नवी दिल्लीहून शांघायला आलेल्या विमानातील प्रवाशांचे चीनमधील भारताचे महावाणिज्य दूत प्रतीक माथुर यांनी स्वागत केले. दोन्ही देशांमध्ये हवाईवाहतूक सेवा पूर्वपदावर येत असून यामुळे शेजारी राष्ट्रांबरोबरील नागरी आणि व्यापारी संबंध सुधारण्याच्या दिशेनं टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. उभय देशांमधील संबंध दृढ होत असून वैश्विक पातळीवर भारत केंद्र म्हणून उदयास येत असल्याचं भारतीय वाणिज्य दुतावासानं समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये

म्हटलं आहे. २०२० मध्ये आलेलं कोरोना महामारीचं संकट आणि त्यानंतर दोन्ही देशांतले ताणले गेलेले राजनैतिक संबंध यामुळे हवाई वाहतूक स्थगित झाली होती.

**<><><><><>**

अंगोला या देशाचा स्वातंत्र्यसंग्राम ते शांतता आणि लोकशाहीपर्यंतचा प्रवास प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज काढले. अंगोलाची राजधानी लुआंडा इथल्या नॅशनल असेंब्लीत त्यांनी अंगोलाच्या संसद सदस्यांना संबोधित केलं. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब असल्याचं त्या म्हणाल्या. अंगोलाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवासोबतच, भारताबरोबरच्या राजनैतिक संबंधांना यंदा ४० वर्षं पूर्ण होत असल्यानं २०२५ हे वर्ष या दोन्ही देशांसाठी खास असल्याचा उल्लेख त्यांनी केला. दोन्ही देशांच्या सामाईक आकांक्षांसाठी हा प्रेरणास्रोत असल्याचंही राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या.

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू***

तत्पूर्वी, आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अंगोलाच्या स्वातंत्र्यसंग्रामाची कहाणी सांगणाऱ्या वस्तुसंग्रहालयालाही भेट दिली.

**<><><><><>**

ढाका इथं सुरू असलेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धा २०२५ स्पर्धेत भारताला दोन पदक निश्चित झाली आहेत. आज झालेल्या उपांत्य फेरीत रिकर्व पुरुष संघ आणि कंपाऊंड महिला संघाने ही अंतिम फेरीत प्रवेश केला. रिकर्व पुरुष संघाल्या यशदीप भोगे, अतानू दास आणि राहुल यांनी कझाकिस्तानवर ५-३ असा विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना येत्या शुक्रवारी भारतीय वेळेनुसार सकाळी ९ वाजून ५५ मिनिटांनी दक्षिण कोरियाविरुद्ध होणार आहे. तर कंपाऊंड महिला संघातल्या दीपशिखा, ज्योती शूरेखा वेणम आणि प्रितिका प्रदीप यांनी उपांत्य फेरीत बांगलादेशचा २३४-२२७ असा पराभव करत अंतिम फेरीत

प्रवेश केला. त्यांचा अंतिम सामना देखील दक्षिण कोरियाविरुद्ध गुरुवारी सकाळी भारतीय प्रमाणवेळनुसार साडेनऊ वाजता होणार आहे.

**//<><><><><>//**